# महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग

**विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,**

**३ रा मजला, नवीन इमारत, वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.**

---

संदर्भ- १) वित्त विभाग शासन निर्णय क्र- विकवि-१२११ / प्र.क्र.२९१ / वि.प्र.४ दि .१८/११/२०११.

२) परिपत्रक क्र. No.JCST/HQ-7/ Restructing/Adm. Instruction/२०१५/B-१ Dt. ०७/१२/२०१५

३) कार्यलयीन आदेश क्र. विविआ २०१५ / आस्था-३ / पुनर्रचना कक्ष /फेररचना / अपिल कार्यभार / प्र.क्र. ७६ दि. १७/१२/२०१५

४) वित्त विभाग शासन निर्णय क्र- विकवि-१२१९ / प्र.क्र.०२ / वि.प्र.४ दि .०८/०२/२०१९

**<u>कार्यालयीन आदेश</u>**

क्र. विराआ २०१५ / आस्था-३ /पुनर्रचना कक्ष /प्रशासकीय बदल /प्र.क्र. ७६ मुंबई दि. - 6 NOV 2019

१. उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील परिपत्रकान्वये कार्यशाखानिहाय कार्यपध्दती ऐवजी भौगोलीक कार्यपध्दती दि.०१/०१/२०१६ पासून विभागात अंमलात आली आहे.त्यानुसार मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खाली नोंदणी दाखल्यांसाठी करदात्यांनी दाखल केलेली अभिवेदने विक्रीकरअधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार वाटप केली जात आहेत. वाटप केलेल्या अभिवेदनांची संबंधित विक्रीकरअधिकारी पडताळणी करून नोंदणी दाखला मंजूर करतात अथवा योग्य माहिती नसलेली अभिवेदने फेटाळतात.

२. वस्तु व सेवाकर कायदा अंमलात आल्यानंतर मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खालील नोंदणी दाखल्यांसाठीची अभिवेदने विभागास अल्प प्रमाणात प्राप्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रशासकीय नियंत्रणासाठी कार्यपध्दतीत खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

३. **मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खालील नोंदणी दाखल्यांसाठीच्या कार्यपध्दतीतील बदल** :

या आदेशान्वये विक्रीकरअधिकारी (क -१०१) नोडल १२ मुंबई [ महाविकास सांकेतांक MUM-VAT-C-१०१] व विक्रीकरअधिकारी (क -१०२) नोडल १२ मुंबई [ महाविकास सांकेतांक MUM-VAT-C-१०२] हे दोन विक्रीकरअधिकारी संपुर्ण राज्यासाठी मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खाली नोंदणी प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहेत.

त्यामुळे राज्यातील सर्व कार्यालयांमध्ये मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खाली नोंदणी दाखल्यांसाठीची अभिवेदने यापुढे वरील नोंदणी प्राधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात यावीत. तसेच प्रलंबित असलेली अभिवेदने विक्रीकरअधिकारी (क -१०१) नोडल १२ मुंबई [ महाविकास सांकेतांक MUM-VAT-C-१०१] व विक्रीकरअधिकारी (क -१०२) नोडल १२ मुंबई [ महाविकास सांकेतांक MUM-VAT-C-१०२] यांच्याकडे स्थानांतरित करण्यात यावीत.

४. **मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खालील नोंदणी दाखला रद्द केल्यामुळे करदात्यांनी दाखल केलेली अपिले निकाली काढण्यासाठी अपिल प्राधिकारी**

त्याचप्रमाणे या आदेशान्वये विक्रीकर सहआयुक्त (अपिले) १ मुंबई व विक्रीकर उपायुक्त (अपिले) ३ यांना, जी अपिले मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खालील नोंदणी दाखला रद्द केल्याच्या आदेशाविरुध्द दाखल केली जातात त्यासाठी अपिल प्राधिकरी म्हणून संपूर्ण राज्यासाठी घोषित करण्यात येत आहे.

संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये विभागाची फेररचना झाल्यानंतर फेररचनेनुसार विक्रीकर सहआयुक्त (अपिले) तसेच विक्रीकर उपायुक्त (अपिले) यांच्या कामाची वाटणी व कार्यक्षेत्र याबाबतचा आदेश संदर्भ क्र ३ अन्वये

निर्गमित करण्यात आला होता. त्या आदेशातील विक्रीकर सहआयुक्त (अपिले) १ मुंबई व विक्रीकर उपायुक्त (अपिले) ३ मुंबई यांच्याकडे संदर्भ क्र ३ च्या आदेशान्वये वाटप केलेल्या कामाव्यतिरिक्त व नेमुन दिलेल्या कार्यक्षेत्रा व्यतिरिक्त मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खालील नोंदणी दाखला रद्द केल्याच्या आदेशाविरुध्द दाखल होणाऱ्या अपिलांबाबतचे काम देण्यात येत आहे. त्यामुळे संपुर्ण राज्यातील विक्रीकरअधिकारी व सहायक विक्रीकरआयुक्त यांनी मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खालील नोंदणी दाखला रद्द केल्याच्या आदेशा विरुध्दचे अपिल यापुढे विक्रीकर उपायुक्त (अपिले) ३ मुंबई [ महाविकास सांकेतांक MUM-APP-E-००३] यांच्याकडे दाखल करण्यात यावे. तर संपुर्ण राज्यातील विक्रीकरउपायुक्त यांनी मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खालील नोंदणी दाखला रद्द केल्याच्या आदेशाविरुध्दची अपिले या पुढे विक्रीकरसहआयुक्त (अपिले) १ मुंबई [ महाविकास सांकेतांक MUM-APP-F-००१] यांच्याकडे दाखल करण्यात यावीत.

तसेच राज्यातील सर्व कार्यालयांमध्ये विक्रीकरअधिकारी व सहायक विक्रीकर आयुक्त यांनी मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खालील नोंदणी दाखला रद्द केल्याच्या आदेशा विरुध्द दाखल करण्यात आलेली जी अपिले प्रलंबित आहेत ती विक्रीकर उपायुक्त (अपिले) ३ मुंबई [ महाविकास सांकेतांक MUM-APP-E-००३] यांच्याकडे तर विक्रीकर उपायुक्त यांनी मुल्यवर्धित कर कायदा २००२ तसेच केंद्रीय विक्रीकर कायदा १९५६ खालील नोंदणी दाखला रद्द केल्याच्या आदेशा विरुध्द दाखल करण्यात आलेली जी अपिले प्रलंबित आहेत ती विक्रीकरसहआयुक्त (अपिले) १ मुंबई [ महाविकास सांकेतांक MUM-APP-F-००१] यांच्याकडे स्थानांतरित करण्यात यावीत.

५. या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**(राजीव जलोटा)**
**विक्रीकर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत:-

१. विशेष विक्रीकरआयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक व मुख्य दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३. अप्पर विक्रीकरआयुक्त, मुंबई- १, २, ३, ४/ठाणे/नाशिक/कोल्हापुर/नागपुर/ठाणे.
४. सर्व विक्रीकरसहआयुक्त.
५. विक्रीकरसहआयुक्त (अपिले) १ मुंबई
६. विक्रीकरउपायुक्त (अपिले) ३ मुंबई
७. आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व कार्यासने.
८. सर्व विक्रीकरउपायुक्त, सहायक विक्रीकरआयुक्त आणि विक्रीकरअधिकारी.